REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख ३ मार्च १९४८ | अंक ८


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा रक्तवर्धक खुराक **आंबावडी** फडके प्रॉडक्टस् नागनाथ पार, पुणें.

**नं. २० साबण** बार सोप आणि वडी वापरा
माणिक सोप वर्क्स, कराड ( जि. सातारा )

# विविध माहिती

**पावसाची टंचाई भोंवली**—ईशान्येकडून येणाऱ्या पावसाचें प्रमाण अतिशय कमी झाल्यामुळें मद्रास प्रांतांतील ५० हजार चौरस मैल प्रदेशांतील पिकें चांगलीं आलीं नाहींत. पावसानें दगा दिल्यामुळें आर्कोणम्, त्रिवेल्लोर आणि कांजीवरम् येथील धरणांपासून उत्पन्न होणाऱ्या विजेच्या शक्तींतही घट झाली आहे. विजेच्या शक्तीवर चालणाऱ्या कारखान्यांना ह्या नैसर्गिक तडाख्याचा परिणाम भोगावा लागत आहे.

**दुष्काळाची सांवली सुटत नाहीं.**—संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेतकी परिषदेचें अधिवेशन फिलिपाइन्समध्यें नुकतेंच भरलें होतें. परिषदेचे चिटणीस मि. व्हेगेल ह्यांनीं असे उद्गार काढले कीं, जगांतील अन्नधान्याच्या पिकांचे मानानें लोकसंख्येची वाढ फार होत असल्यानें येतीं तीन-चार वर्षें तरी अन्नधान्याच्या दृष्टीनें काळजीचीं जातील. युद्धापूर्वीपेक्षां तांदुळाचें जगांतील उत्पादन आज ८६ टक्केच आहे. आशिआंत तांदुळच मुख्यतः खाणारे १०० कोटी लोक आहेत आणि येत्या ३० वर्षांत आशिआंतील लोकसंख्या ४० कोटींनीं वाढेल असा अंदाज आहे.

**मुंबई प्रांताला कमी पेट्रोल मिळणार**—फेब्रुवारी ते एप्रिल ह्या तिमाहीसाठी मुंबई प्रांताला मिळणाऱ्या ५९,६०,००० गॅलन्स पेट्रोलमध्यें हिंदी सरकारनें ३,००,००० गॅलन्सची कपात करण्याचें जाहीर केलें आहे. पेट्रोलचा पुरवठाच कमी असल्यानें ही कपात करण्यांत आली असें म्हणतात. मुंबई प्रांताला मिळणाऱ्या पेट्रोलची वाटणीही थोडीशी अडचणीची होईल. कारण, खुद्द मुंबईंतच मोटार गाड्यांची संख्या ४०,००० पासून ५०,००० पर्यंत येऊन पोचली आहे.

**महात्माजींच्या स्मारकाची योजना**—सुप्रसिद्ध हिंदी शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन् ह्यांनीं महात्मा गांधींच्या स्मारकाची एक योजना सुचविली आहे. त्यांच्या मतें, प्राथमिक शिक्षणाच्या वर्गापासून ते सहत पदवी परीक्षेपर्यंत व नंतरच्याहि प्रत्येक वर्गाला झेपतील अशीं गांधीजींच्या उपदेशपर व्याख्यानांचीं पाठ्य पुस्तकें तयार करावींत. अशा रीतीनें अगदीं लहानापासून म. गांधींचीं तत्वज्ञानाची शिकवण दिली तर एका पिढींत फार मोठा फरक पडेल असें त्यांचें म्हणणें आहे. महात्माजींचा पुतळा उभारणें अगर एखादी इमारत बांधणें ह्यापेक्षां वरील स्मारक त्यांच्या मतें अधिक प्रभावी होईल.

**दामोदर नदी योजना**—दामोदर नदी योजनेस ५५ कोटी रु. खर्च येईल, असा आजचा अंदाज आहे. दामोदर नदी बिहार व पश्चिम बंगाल ह्या प्रांतांतून वहाते. नदीचे पूर थांबवून तिचा प्रवाह संथ करण्यांत यावयाचा आहे. कालव्यांखालीं ७,६३,८०० एकर जमीन नव्यानें येईल. ३,५०,००० किलो वॅट वीज तयार होईल, तिचा औद्योगीकरणास चांगला उपयोग होईल. मुख्य कालव्यांतून बोटी चालूं शकतील, त्यांतून कोळशाच्या खाणीस वहातुकीचें उत्कृष्ट साधन निर्माण होईल. बिहारमधील बरीच जमीन पाण्याखालीं बुडेल, परंतु अशा जमिनीच्या मालकांची दुसरीकडे व्यवस्था केली जाईल. योजना पुरी होण्यास १० वर्षें लागतील.

**स्टर्लिंगबाबत करार**—हिंदी व ब्रिटिश प्रतिनिधींमध्यें, ग्रेटब्रिटनमध्यें सांचलेल्या हिंदी येण्यांबाबत वाटाघाटी चालू होत्या, त्या संपून आतां १४ ऑगस्ट, १९४७ च्या कराराची मुदत ३० जून, १९४८ अखेर वाढविण्यांत आली आहे.

**वेधशाळा**—हिंदुस्थानांत एकूण ३२० सरकारी वेधशाळा आहेत. त्यांपैकी कोडाई कनाल, मुंबई, दिल्ली व कलकत्ता येथील वेधशाळा विशेष महत्त्वाच्या आहेत.

**पाकिस्तानचा कंपनी कायदा**—पाकिस्ताननें हिंदुस्थानच्या पूर्वीच्याच कंपनी कायद्यांत कांहीं फरक करून तोच कायदा पाकिस्तानसाठी मंजूर केला आहे असें समजतें. पाकिस्तानी कंपनी कायद्याप्रमाणें, ज्या कंपन्यांच्या कचेऱ्या १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी पाकिस्तानच्या प्रदेशांत होत्या त्यांनीं पाकिस्तानचा कंपनी कायदा अंमलांत आल्यापासून सहा महिन्यांच्या आंत पाकिस्तानांत आपली नोंद करून घेतली पाहिजे.

**नॅ. सेव्हिंग्ज सार्टिफिकिटें व विमा कंपन्या**—हिंदी संघराज्याच्या मुख्य विमाधिकाऱ्यानें विमा-कंपन्यांना व प्रॉव्हिडंट सोसायट्यांना असें कळविलें आहे कीं, कांहीं मर्यादेपर्यंत त्यांनीं आपले पैसे नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्सच्या तारणांत गुंतविले तरी चालेल. इतर सरकारी रोख्यांच्या मानानें ह्या गुंतवणुकीवर व्याज बरें पडतें आणि त्यावर प्राप्तीचा करही माफ आहे. विमा कायद्याच्या २७ व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या रोख्यांत ह्या सर्टिफिकेट्सचा अंतर्भाव होतो, असा खुलासाही करण्यांत आला आहे.

**मध्यम वर्गाच्या आरोग्याची तपासणी**—इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या मुंबई शाखेनें मुंबईंतील मध्यम वर्गाचा आहार व आरोग्य ह्याविषयीं आंकडे-शास्त्रीय तपासणी करण्याचें ठरविलें आहे. एक आठवड्यांत खाण्यांत येणाऱ्या दररोजच्या अन्नाचा तपशील कांहीं कुटुंबांकडून मागविण्यांत येईल. त्याचप्रमाणें ठरलेल्या वेळीं डॉक्टर्स जाऊन त्या कुटुंबांच्या आरोग्याचीही तपासणी करतील. ह्या तपासणीला शास्त्रीय महत्त्व तर आहेच, पण निवडलेल्या कुटुंबांना आहार व आरोग्य ह्यांच्याबद्दल सल्लाही मिळेल.

---


## नोटीस

### भोर स्टेट बँक लिमिटेड, भोर.

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागिदारांची चौथी साधारण सभा रविवार ता. २१ मार्च १९४८ इ. रोजीं दुपारीं ३ वाजतां धी औंध म्युच्युअल लाईफ ॲशुअरन्स सोसायटी लिमिटेड, रामनिवास, लक्ष्मी रोड, पुणें येथें खालील कामासाठीं भरेल.

(१) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४७ अखेरचा ताळेबंद, नफातोटापत्रक आणि संचालक मंडळ व हिशेब तपासनीस यांच्या अहवालांचा विचार करणें,

(२) डिव्हिडंड मंजूर करणें,

(३) निवृत्त होणाऱ्या पण फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या चार संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें,

(४) हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें,

(५) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

संचालक मंडळाचे हुकुमावरून

पुणें
ता. २२ फेब्रुवारी, १९४८

रा. गो. आगाशे,
व्यवस्थापक

वि. सू.—बँकेच्या शेअर वर्गीकरण वह्या ता. ८ मार्च १९४८ ते २२ मार्च १९४८ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

डिव्हिडंड देण्याचें मंजूर झाल्यानंतर तें शनिवार ता. १ मे १९४८ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वारंटस भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

# अर्थ

बुधवार, ता. ३ मार्च १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक

हिंदुस्थान सरकारचे अर्थमंत्री, श्री. षण्मुखम चेट्टी, ह्यांनीं शनिवार, ता. २८ फेब्रुवारी रोजीं हिंदी पार्लमेंटास मध्यवर्ती सरकारचें १९४८-४९ चें अंदाजपत्रक सादर केलें. १९४७-४८ (१५-८-४७ ते ३१-३-४८) चे व १९४८-४९ (१-४-४८ ते ३१-३-४९) चे तुलनात्मक आकडे येथें दिले आहेत:–

| | १९४७–४८ (साडेसात महिने) कोटी रु. | १९४८–४९ (बारा महिने) कोटी रु. |
|---|---|---|
| उत्पन्न | १७८·७७ | २३०·५२ |
| खर्च | १८५·२९ | २५७·३७ |
| तूट | ६·५२ | २६·८५ |

### उत्पन्न–खर्चाच्या प्रमुख बाबी

१९४७-४८ च्या अंदाजपत्रकाशी १९४८-४९ च्या अंदाजपत्रकाची तुलना करणें अनेक दृष्टींनीं सोइस्कर किंवा उपयुक्त होणार नाहीं. १९४८-४९ मधील उत्पन्नाच्या आकड्यांत ८१३/४ कोटी रुपये कस्टम्सच्या उत्पन्नाचे आहेत. त्यांत चालू वर्षीच्या कापड व सूत ह्यांच्या निर्गतीवरील पट्टीचा समावेश होतो. एक्साइजपासून ३४ कोटी रुपये अपेक्षित आहेत. इनकम टॅक्स १३० कोटी रुपये देईल. ८०३/४ कोटी रुपये इनकम टॅक्स 'पूल' पैकीं प्रांतांस ३७ कोटी, ८७ लक्ष रुपये वाटून देण्यांत येतील. चलन व टांकसाळ ह्यांचें उत्पन्न ९३/४ कोटी रु. भरेल. पोस्ट व तार खातें २६ कोटी, २ लक्ष रुपये मिळवून २५ कोटी, ८२ लक्ष रु. खर्च करील आणि ३८ लक्ष रु. मध्यवर्ती तिजोरीस देईल.

खर्चाच्या बाबींत लष्करी खात्याचे १२१ कोटी रुपये आहेत. भांडवली खर्चासाठीं त्या खात्यास १५ कोटी रुपये लागणार आहेत, ते वेगळेच. निर्वासितांची सोय लावून देण्यांत १० कोटी रु. खर्ची पडतील. निर्वासितांना आर्थिक भांडवली मदत करण्यासाठीं १० कोटींची तरतूद केलेली आहे. धान्य पुरवठ्यासाठीं येणारा खर्च हिशेबांत घेतला, म्हणजे मामुली खर्चासाठीं १०६३/४ कोटी रुपये उरतात. त्यांपैकीं ९ कोटी रुपये करवसुलीसाठींच लागतील आणि ४३ कोटी, ८६ लक्ष रुपये व्याज, पेन्शनें, कर्जफेड, इत्यादींवर खर्च होतील. शिक्षण, वैद्यक, आरोग्य, नभोवाणी, इत्यादि राष्ट्रोद्धारक खात्यांस मिळून २१ कोटी रुपये लागणार आहेत आणि उरलेल्या २४३/४ कोटींत राज्यकारभाराचा खर्च भागविला जाईल. ह्या खेरीज ३० कोटी रुपये प्रांतिक सरकारांस राष्ट्रोद्धारक कार्यक्रमासाठीं ग्रँट म्हणून दिले जातील व त्यांस ३४ कोटी रुपये कर्जाऊ देण्यांत येतील.

### जुन्या, प्रत्यक्ष करांत कपात

अर्थमंत्र्यांनीं कांहीं करभार कमी केला असून पांच-सहा नवे कर सुचविले आहेत. बिझिनेस प्रॉफिट टॅक्स व सुपर टॅक्स ह्यांचा उद्योगधंद्यांवरील भार कमी होणार आहे, त्यामुळें सरकारास अनुक्रमें २ व १ कोटी रुपये कमी मिळणार आहेत. लिमिटेड कंपन्यांच्या नफ्यापैकीं जो भाग प्रत्यक्ष भागीदारांस वाटला जात नाहीं अशा नफ्यावरील कराचा दर एका आण्यानें कमी केल्यामुळें २ कोटी रुपयांस सरकार मुकेल. २५ हजारांपेक्षा उत्पन्न कमी असणाऱ्या लहान कंपन्यांवरील इनकम टॅक्सचा दर सध्याच्या निम्मा केला जाईल. "त्यामुळें लहान कंपन्यांना उत्तेजन मिळेल आणि औद्योगिक प्रगति योग्य मार्गानें होण्यास सहाय होईल" कंपन्यांचे त्यामुळें १२ लक्ष रुपये वाचतील. सरकारनें मान्य केलेल्या यादींतील संस्थांस २१/२ लक्ष रुपयांपर्यंत देणगी देणाऱ्या कंपनीस व व्यक्तीस, देणगीच्या रकमेवर इनकमटॅक्स माफ होईल. अर्थात् ही देणगी कंपन्यांच्या बाबतींत त्यांच्या कर-पात्र नफ्याच्या ५% पेक्षा अधिक असता कामा नये. व्यक्ती मात्र १०% पर्यंत देणग्या देऊन कराची माफी मिळवूं शकतील. मध्यवर्ती सरकारास त्यामुळें ७५ लक्ष रुपये कर कमी मिळेल. मालमत्तेवरील भरलेल्या म्युनिसिपल करास इनकम टॅक्सची माफी केल्यामुळें ७५ लक्ष रु. सरकारचे बुडतील. लिमिटेड कंपन्यांना त्यांच्या नफ्यावर रुपयांत २ आणे कॉर्पोरेशन टॅक्स यावा लागतो, तो आतां ३ आणे करण्यांत येईल, परंतु हिंदी कंपन्यांस १ आणा परत मिळेल; बिदेशी कंपन्यांवरच ह्या कराचा बोजा बसेल व त्यामुळें सरकारास २ कोटी रुपये मिळतील. इनकमटॅक्समधील सवलती आणि कॉर्पोरेशन टॅक्समधील दुरुस्ती ह्या सर्वांची गोळाबेरीज केली, तर मध्यवर्ती सरकारचें ह्या बाबींवरील उत्पन्न १ कोटी, ६६ लक्ष रुपयांनीं कमी होणार आहे. कापडाच्या निर्गतीवर ह्यापुढें २५% जकात घेतली जाईल. सुताच्या निर्गतीवरील जकात रद्द केली जाईल. हातमागाचें कापड जकात न देता निर्गत होऊं शकेल. ह्यामुळें कराचें उत्पन्न ४१/२ कोटींनीं घटेल. सुपारीवरील एक्साइजपट्टी रद्द केल्यामुळें ३० लक्ष रुपये उत्पन्न कमी होईल.

### नव्या करांची योजना

गळिताचीं धान्यें, वनस्पति तूप व मँगनीज ह्यांचे निर्गतीवर दर टनास अनुक्रमें ८०, २०० व २० रु. जकात भरावी लागेल. मोटार गाड्यांची आयात जकात ४५% ची ५०% होईल, परंतु त्यांत ब्रिटिश मोटारींना ७१/२% सूट मिळेल. हिंदी सिगारेट्सवर २५% एक्साइज (अंतर्गत उत्पादनावरील) ड्यूटी बसेल आणि तिला अनुसरून तंबाखूवरहि ड्यूटी येईल. चहावरील एक्साइज ड्यूटी पौंडास २ आणे होती ती ४ आणे होईल. कॉफीवरील ड्यूटिहि ४ आणे होईल. वनस्पति तुपावरील ड्यूटी ५०% ने वाढून ती टनास ७ रु. ८ आणे होईल. टायर्सहि पूर्वीपेक्षा ५% जास्त देतील. आगपेट्यावर प्रत्येक ग्रोसला २ रु. ८ आ. एक्साइज ड्यूटी बसेल. पोष्ट व तार खात्याच्या वाट्यास दोन बाबींत दरवाढ आली आहे. रजिस्ट्रेशनला हल्लीं ३ आणे पडतात ते ह्यापुढें ४ आणे पडतील. ट्रंक टेलिफोनवरील सरचार्ज ४०% चा ६० % करून त्याचें रूपांतर मूळ दरांतच केलें जाणार आहे.

### अर्थ मंत्र्यांचें समर्थन

अंदाजपत्रक व करपद्धतींत सुचविलेले फेरफार ह्यांचें समर्थन करताना अर्थमंत्री श्री. षण्मुखम चेट्टी ह्यांनीं खालील उद्गार काढले. "तूट भरून काढतांना दोन महत्त्वाचीं उद्दिष्टें मी नजरेसमोर

ठेवली; (१) १९४७–४८ च्या बजेटानें उद्योगधंद्यावर भरमसाट बोजा टाकला होता, तो कमी करणें व (२) नवीन कराचा बोजा गरीबांवर पडूं न देणें." हीं दोन्हीं उद्दिष्टें कितपत साध्य होत आहेत, हें त्यांवरील मतप्रदर्शनावरून स्पष्ट होईल. बिझिनेस प्रॉफिट टॅक्स इत्यादींची तीव्रता कमी झाल्यामुळें उद्योगपतींना आनंद झाला असला तरी ते संतुष्ट झालेले दिसत नाहींत. अप्रत्यक्ष कराचा भार सामान्य नागरिकांवरच मुख्यत्त्वें करून बसणार ही गोष्टहि विसरून चालणार नाहीं. सामान्य नागरिकावर अप्रत्यक्ष ओझें लादून बड्या कारखानदारांवरील प्रत्यक्ष करभार हलका करण्यांत अर्थमंत्र्यांनीं निश्चित यश मिळविलें आहे. लहान लिमिटेड कंपन्यांवरील करभार कमी झाल्यानें गरीब कंपन्यांवरील अन्याय अंशतः तरी दूर झाला आहे, परंतु कॉर्पोरेशन टॅक्सचा बोजा लहान-थोरांस सारख्याच प्रमाणांत सहन करावा लागणार आहे; ह्याबाबतींत सुधारणा होणें अगत्याचें आहे. त्याखेरीज लहान उपक्रमांस प्रोत्साहन देण्याचें धोरण यशस्वी होणार नाहीं.

---

### पाकिस्तानचें १९४८–४९ चें अंदाजपत्रक

| | लक्ष रुपये |
|---|---|
| उत्पन्न | ७९,५७ |
| खर्च | ८९,६८ |
| तूट | १०,११ |

पाकिस्तानच्या अंदाजपत्रकांत त्या देशाच्या रेल्वेजच्या उत्पन्न–खर्चाचाहि समावेश होतो.

---

## ब्रिटनची निर्गत वाढविण्याची शिकस्त

### परराष्ट्रीय व्यापारांतील तूट भरून काढण्याचा प्रयत्न

ग्रेट ब्रिटननें १९४७ सालीं १९३८ च्या मानानें २½ पट किंमतीच्या मालाची निर्गत केली. ह्या निर्गतीची किंमत ११४ कोटी पौंड भरली. निर्गत मालाची किंमतीचे दृष्टीनें २½ पट वाढ झाली असली तरी प्रत्यक्ष माल पाहिला तर तो ८% च जास्त निर्गत झाला आहे. महागाईमुळें निर्गतीचा आंकडा अशा रीतीनें २½ पट झालेला दिसतो. जून १९४७मध्यें ब्रिटिश सरकारनें मालाची निर्गत वाढविण्याचा जो निर्धार प्रसिद्ध केला होता, त्याचे मानानें प्रत्यक्ष निर्गत बरीच कमी झालेली आहे. यंत्रसामुग्री, मोटार गाड्या, लोखंड–पोलाद, कपास, रसायनें व लोकर ह्या मालाचेंच निर्गतींत प्राधान्य होतें. धातूंच्या मालाचाच एकूण निर्गतींत ४८% इतका भरणा आहे; १९३८ मध्यें हें प्रमाण फक्त ३७% होतें. ब्रिटिश मालाची युद्धापूर्वी परदेशांकडेच निर्गत विशेष होत असे; १९४७ मध्यें ती मुख्यतः ब्रिटिश साम्राज्यांतील देशांकडेच झाली. ब्रिटिश मालाची एवढी निर्गत झाली, तरीसुद्धां निर्गतीपेक्षां आयातीची किंमत ५९ कोटी पौंड अधिक भरली. म्हणजे, वर्ष अखेर, ५९ कोटी पौंडांची परराष्ट्रीय व्यापारांत तूटच आली. दिलें, त्यापेक्षां ५९कोटी पौंडांचें जास्त खाल्लें व वापरलें. ही तूट भरून काढण्याचा ब्रिटनचा प्रयत्न चालू आहे. ही तूट भरून निघाली, म्हणजे नंतर निर्गतींतून डॉलर उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण होणार! १९४८ मध्यें निर्गतीची आणखी शिकस्त केली जाईल.

---

### १९४८ साल अमेरिकेला कसें जाणार ?

युद्धोत्तर अमेरिकन उद्योगधंद्यांचा आणि व्यापाराचा व्याप जगभर पसरला आहे. अर्थातच, अमेरिकन उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या तेजी–मंदीवर थोड्या–फार अंशानें जगांतील व्यापाराचें भवितव्य अवलंबून असणार. अमेरिकेंतील 'फॉर्च्यून' ह्या मासिकाच्या जानेवारीच्या अंकांत, सुमारें २८,२०० उद्योगपतींनीं अमेरिकन अर्थव्यवस्थेसंबंधीं व्यक्त केलेलीं मतें दिलेलीं आहेत. सबंध १९४८ सालांत अमेरिकेंतील उद्योगधंद्यांना व व्यापाराला तेजीचे दिवस जातील असें त्यांपैकीं बहुतेकांचें मत आहे. १९४७ च्या मे महिन्यांत मात्र ७४ टक्के उद्योगपतींचें असें मत होतें कीं १९४८ साल अखेर मंदी येणार. उद्योगधंद्यांतून उच्च पदावर काम करणाऱ्या लोकांपैकीं ६५ टक्के लोक १९४७ सालाप्रमाणेंच १९४८ च्या पहिल्या सहा महिन्यांत अधिकांत अधिक नफा मिळेल अशी अपेक्षा करीत आहेत. ह्या पहिल्या सहा महिन्यांत वरील अधिकाऱ्यांपैकीं कोणालाही मालाच्या किंमती कमी कराव्या लागतील असें वाटत नाहीं. उलट, त्यांच्यापैकीं एक तृतियांश अधिकारी, मालाच्या किंमती वाढवितां येतील अशी अपेक्षा करीत आहेत. ग्राहकांच्या दृष्टीनें विचार करतां ५९ टक्के अमेरिकन उद्योगपतींचें असें मत आहे कीं, सप्टेंबर १९४७ मध्यें ग्राहकोपयोगी मालाच्या किंमतीचा निर्देशांक १६४ होता तो येत्या जुलैमध्यें १६६ होईल. १९४८ साल अमेरिकन अर्थव्यवस्थेला कसें जाईल यासंबंधी टक्केवारी मतें पुढीलप्रमाणें पडलीं:—

| | |
|---|---|
| एकदम मोठी तेजी | १% |
| थोडी-बहुत तेजी | २० |
| फारसा फरक पडणार नाहीं | ३९ |
| थोडी-बहुत मंदी | ३७ |
| एकदम मोठी मंदी | २ |
| अंदाज लागत नाहीं | १ |
| | १०० |

---

### १९४७ सालांतील लोखंड–पोलादाचें शेतकऱ्यांस वांटप

नोव्हेंबर, १९४६ पासून लोखंड व पोलादावरील नियंत्रण हिंदी मध्यवर्ती सरकाराकडून प्रांतिक सरकारकडे सोपविण्यांत आलें. त्यामुळें वांटप करणाऱ्या अधिकाऱ्याला, लोखंड व पोलाद कोठून मिळूं शकेल ह्याची अधिक चौकशी करून तें शेतीसाठी जास्तींत जास्त प्रमाणांत देतां आलें. असिस्टंट अग्रिकल्चरल एंजिनियर, मुंबई ह्या अधिकाऱ्यानें १९४७ सालीं एकूण १३,४७५ टन पोलाद व लोखंड ह्यांचें वांटप केलें. गेल्या अडीच वर्षांतील सरासरी वांटप वार्षिक फक्त ५,००० टन होतें. १९४७ सालीं शेतकीसाठी वांटप झालेल्या लोखंड-पोलादाची किंमत सुमारें ४५ लाख रुपये आहे. ह्याशिवाय, सुमारें १,२५,००० रुपये किंमतीचे नळ बोअरिंगच्या विहीरी, पंप वगैरेसाठी वांटण्यांत आले. त्यामुळें शेतीसाठी पाणी मिळण्याला साह्य झालें. १९४७ सालीं रहाटासाठी बरेच पोलाद नियंत्रित किंमतीनें पुरविण्यांत आलें. रहाटाची किंमत ७००।८०० रुपयांपासून ५५०।६०० पर्यंत खाली उतरली आहे. एकंदरीनें शेतकीसाठी लागणाऱ्या लोखंड-पोलादाची गरज कांहीं प्रमाणांत भागविण्यांत आली आहे.

## मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक

मुंबई सरकारचे अर्थमंत्री, श्री. वैकुंठराय ल. मेहता, ह्यांनी गेल्या आठवड्यांत प्रांतिक विधिमंडळास १९४८–४९ चें अंदाजपत्रक सादर केलें. ह्या अंदाजपत्रकांत २,६३,५८,००० रु. तूट अपेक्षिली आहे. ती भरून काढण्यासाठी १ कोटी रुपये उत्पन्न देणारी करवाढ सुचविण्यांत आली असून १ कोटी, ७० लक्ष रुपयांची तरतूद तेवढी रकम युद्धोत्तर पुनर्घटना फंडांतून काढून घेऊन करण्यांत यावयाची आहे. म्हणजे २ कोटी, ७० लक्ष रुपये मिळतील व तुटीचें रुपांतर ६ लक्ष, ४२ हजारांच्या वाढाव्यांत होईल.

खालील तक्त्यांत १९४६–४७ चे पक्के हिशेब, १९४७–४८ चा दुरुस्त अंदाज व १९४८–४९ चा अंदाज देणारे आकडे एकत्रित दिले आहेत:—

### तीन वर्षांची तुलना

उत्पन्न

( आकडे हजार रुपयांचे आहेत )

| बाब | १९४६–४७ पक्का हिशेब | १९४७–४८ अंदाज | १९४८–४९ दुरुस्त अंदाज |
|---|---|---|---|
| शेतीवरील कर ( कॉर्पो. टॅक्स वगळून ) | ५,९७,४० | ६,२४,५४ | ७,५७,२६ |
| जमीन महसूल | ३,६५,५२ | ३,७७,५९ | ३,६८,५५ |
| एक्साइज | ९,७४,२५ | ८,४१,७० | ६,७०,०० |
| स्टँपस् | ३,३०,८७ | ३,१६,४४ | ३,१५,२९ |
| जंगल | २,६९,८३ | २,३५,४१ | १,९५,६१ |
| रजिस्ट्रेशन | ३०,२४ | ३०,५५ | २८,१८ |
| मोटार व्हे. ॲक्टाखालील उत्पन्न | ७८,०३ | ९३,९६ | ७७,५४ |
| इतर कर | ५,३४,७० | ८,५८,८१ | ८,६१,३८ |
| सि. ॲडमिनस्ट्रेशन | ५,०९,५६ | ४,२३,२७ | ३,७२,२३ |
| इतर उत्पन्न | ३,२७,१४ | ५,४७,१८ | ४,९२,३८ |
| | ४०,१७,५४ | ४३,४९,४५ | ४१,३८,४२ |

खर्च

| बाब | १९४६–४७ पक्का हिशेब | १९४७–४८ अंदाज | १९४८–४९ दुरुस्त अंदाज |
|---|---|---|---|
| सर्वसाधारण कारभार | २,००,१८ | २,१३,४८ | १,९४,८८ |
| शिक्षण | ४,५२,०४ | ६,२०,७१ | ७,९३,७० |
| वैद्यक | १,१९,२४ | १,४०,९३ | १,५६,९८ |
| आरोग्य | ८७,३४ | १;१३,८१ | १,४०,३७ |
| पोलिस व तुरुंग | ५,४०,६२ | ६,२३,८० | ६,३४,३३ |
| शेती | २,४८,१३ | २,९३,१८ | २,४८,९० |
| उद्योगधंदे | २८,६७ | ४०,६४ | ६६,३० |
| सहकार | २९,५२ | ५०,४१ | ६३,४२ |
| न्यायखातें | ९९,१० | १,०४,४७ | १,०३,८० |
| इतर खर्च | १८,३६,७१ | २०,९१,७५ | १९,९९,६२ |
| | ३६,४१,५५ | ४२,९३,१८ | ४४,०२,०० |
| वाढावा (+) तूट (−) | +३,७५,९९ | +५६,२७ | −२,६३,५८ |

चालू वर्षी ( १९४७–४८ ) ५ लक्ष, ९३ हजारांची तूट येईल, अशी प्रारंभीं कल्पना होती; परंतु दुरुस्त अंदाजाप्रमाणें, मार्च अखेरच्या ह्या वर्षांत ५६ लक्ष, २७ हजारांचा वाढावा हातीं पडेल, अशी अपेक्षा आहे. सेल्स टॅक्सनें दिलेल्या २½ कोटी रुपयां-मुळें पोलीस, शिक्षण, इत्यादि खात्यांवर खर्च वाढला तरी वाढावा उरत आहे. १९४८–४९ च्या अंदाज पत्रकांत केलेली राष्ट्र-संवर्धक बाबींवरील वाढत्या खर्चाची तरतूद पाहिली, म्हणजे पुढील वर्षी येणाऱ्या तुटीबद्दल आश्चर्य वाटणार नाहीं. दारूबंदीचें उत्पन्न चार वर्षांत अजिबात बंद होणार असून, येत्या वर्षीच्या ह्या उत्पन्नांत सरकारनें १ कोटी, ७० लक्ष रुपयांची घट घडवून आणण्याचें योजिलें आहे. पुनर्घटनेच्या योजनांवरील नियोजित खर्चाचे आंकडे पुनः तपासून, त्यांत १५ कोटींची काटकसर करणें अगत्याचें झालें आहे. म्हणजे, पंच वार्षिक योजनेवर ९० कोटींऐवजीं ७५ कोटी रु. खर्चले जातील.

अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत मुंबई सरकारच्या संवर्धक योजनांची चर्चा केली, तिचा तपशील आज येथें दिला नाहीं तरी त्यांनीं करवाढीच्या योजनेच्या तत्त्वांचें जें विवेचन केलें, त्याचा मात्र उल्लेख करणें आवश्यक आहे. (१) सुधारलेल्या पद्धतीच्या किमान पातळीच्या जीवनास आवश्यक इतकेंहि ज्यांचें सध्याचें उत्पन्न नाहीं, अशांवर करभार पडूं नये, व (२) सर्व-साधारण समाजावर आर्थिक ताण शक्य तितका कमी पडावा, अशीच कर योजना असावी, असें त्यांनीं सांगितलें. सुचविलेली करवाढ ह्या तत्त्वांस धरूनच आहे. लोकांनीं आपल्या जादा उत्पन्नां-तून केलेल्या खर्चावरच कराचा बोजा टाकण्यांत येत आहे; जीवनास अत्यावश्यक गोष्टींवर करभार टाकलेला नाहीं. आर्थिक समतेचें उद्दिष्ट गाठण्यास अशा पद्धतशीर कर योजनांचा उपयोग चांगला होईल अशी अपेक्षा आहे. अर्थमंत्र्यांच्या भाषणांतील करवाढीच्या तत्त्वांचा हा पुनरुच्चार सामान्य जनतेस स्वागतार्ह वाटल्याविना रहाणार नाहीं.

---

### तूट भरण्यासाठी कर योजना

| | लक्ष रु. |
|---|---|
| चैनीच्या वस्तूंवर जादा सेल्स टॅक्स (रुपयांत ६ पै ऐवजी १ आणा; वस्तूंची यादी मागाहून प्रसिद्ध) | ४० |
| कपास बाजारांतील व्यवहारांवर स्टँप ड्यूटी (नवा कर) (प्रत्येक ५० गाठींवर म्हणजे सुमारें १० हजार रु. च्या उलाढालीवर ४ आ.) | ५ |
| बेटिंग टॅक्समध्यें वाढ (८% चा १०%; १२½% पर्यंत वाढविण्यास मोकळीक) | २० |
| करमणुकीवरील करांत वाढ (२५% वाढ. ५ आ. चे तिकिटांत वाढ नाहीं, परंतु १० आ. च्या तिकिटास १० ½ आ., ह्या प्रमाणांत पुढें वाढ. रेसकोर्सच्या ५ रु. च्या तिकिटास ५ रु. ८ आ.) | १५ |
| पेट्रोलवरील सेल्स टॅक्स (६¼% ऐवजी १२½%) | २० |
| करवाढीपासून एकूण अपेक्षित जादा उत्पन्न | १०० |

## कंपनी कायद्याचें ८६ एफ् कलम

### डायरेक्टर पद रद्द केव्हां होतें ?

'डायरेक्टरांनीं कंपनीशीं खरेदीसंबंधीं कांहीं करार केल्यास त्यांचें डायरेक्टर पद रद्द होतें असें इंडियन कंपनीज ॲक्ट कलम ८६ एफ् मध्यें नमूद आहे. त्या कलमाच्या मर्यादा काय आहेत ह्याचा वाद आतां फेडरल कोर्टांत जाणार आहे.

राजा धनराजगिरजी नरसिंगगिरजी यांचे धनराज मिल्स लि. मध्यें ३,००० शेअर्स असून त्यांना मिलचे तहाहयात डायरेक्टर नेमण्यांत आलें होतें व तेच डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्षहि होते. आक्टोबर, १९४६ मध्यें राजा धनराजगिरजी यांनीं कंपनीशीं कांहीं खरेदींचा करार केला व त्यावरून त्यांचें डायरेक्टर पद रद्द झालें; अशी तक्रार कंपनी कायद्याच्या ८६ एफ् कलमाखालीं कंपनीतर्फे करण्यांत आली. त्यावर राजा धनराजगिरजी यांनीं दिवाणी कोर्टांत दावा दाखल करून 'आपलें डायरेक्टर पद अबाधित असून कंपनीला आपल्या डायरेक्टर पदाच्या अधिकाराचे कामास प्रतिबंध करता येत नाहीं,' अशा निर्णयाचा ठराव (डिक्लरेशन) करून मागितला. मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्री. भगवती यांनीं राजा धनराजगिरजी यांच्या बाजूनें निर्णय देऊन जरूर तो ठराव करून दिला होता. परंतु कंपनीतर्फे त्या निर्णयावर अपील करण्यांत आलें. अपिलांत कलम ८६ एफ् अन्वयें कंपनीशीं कोणताहि खरेदीचा करार केला असतां डायरेक्टर पद रद्द होतें, असा त्या कलमाचा अर्थ लावला जाऊन अपील कोर्टानें तो निकाल फिरविला. येथपर्यंतची या प्रकरणाची माहिती 'अर्था'त यापूर्वी प्रसिद्ध झालेली आहे. तदनंतर राजा धनराजगिरजी ह्यांनीं सदर निर्णयाविरुद्ध फेडरल कोर्टाकडे अपील करण्यास परवानगी मागणारा अर्ज मुंबई हायकोर्टाकडे दाखल केला. त्याचा विचार सरन्यायाधीश व न्यायमूर्ती श्री. दीक्षित यांनीं करून तशी परवानगी आतां दिली आहे. फेडरल कोर्टाकडे अपील करावयास परवानगी द्यावयाची, तर सामान्यतः वादांतील प्रश्नाचा संबंध दहा हजार किंवा त्याहून अधिक किंमतीच्या मालमत्तेशीं असावा लागतो. ह्या दाव्यांत राजा धनराजगिरजी यांचा डायरेक्टर हा दर्जा हाच दाव्याचा विषय होता. कोणाच्याहि केवळ दर्जाचे मोल रुपये-आणे-पैंत होऊं शकत नाहीं. बरें, दहा हजार अगर त्याहून अधिक मालमत्तेवर कोठल्याहि प्रकाराचा हक्क त्या दाव्यांत निर्णयार्थ नव्हताच. त्यामुळें फेडरल कोर्टाकडे अपील न्यावयास हायकोर्टानें परवानगी कशी द्यावी हा मोठा प्रश्न होता. परंतु राजा धनराजगिरजी हे मिलचे तहाहयात डायरेक्टर व डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष होते. कंपनीच्या भाग-भांडवलांत त्यांचा मोठा हिस्सा होता व त्यामुळें मिलच्या कारभारांत त्यांचा पुष्कळ अधिकार चालत होता. अशा स्थितींत राजा धनराजगिरजी ह्यांचें डायरेक्टर-पदही त्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची व फायद्याची बाब होती. सार्वजनिक महत्त्वाचे खाजगी वा अन्य प्रश्न असतील तर त्यांच्या निर्णयार्थ अंतिम कोर्टाकडे अपील न्यावयास परवानगी द्यावयास हरकत नाहीं, असा प्रीव्ही कौन्सिलचा निर्णय आहे. त्याला अनुसरून व खालील दोन्ही कोर्टांचे निकाल परस्पर-विरुद्ध असल्यामुळें साधक-बाधक मुद्यांची योग्य छाननी व्हावी या हेतूनें हायकोर्टानें राजा धनराजगिरजी यांना फेडरल कोर्टाकडे अपील करण्यास परवानगी दिली आहे.

कंपनी कायद्याच्या सदरील ८६ एफ् या कलमाच्या अर्थव्याप्तीस सार्वत्रिक महत्त्व असल्याकारणानें व्यावसायिक जनतेचें लक्ष आतां फेडरल कोर्टाच्या निर्णयाकडे लागून रहाणें साहजिक आहे.


नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

अस्सल रशियन प्रोसेस ऑईलपेंट
परमपूज्य महात्माजींचा फोटो
सा. १२×१० किं. रु. १० फक्त.
शिवाय लहान कॉपीज प्रत्येकीं आणे ६, ८ व फुल साईज ११ आणे.
सनेक्स फोटो स्टुडिओ
(पॅरेमाउंट लि.) १७९ बेलबाग चौक, पुणें २

कृष्णा शुगर मिल्स लि.
कृष्णा—कित्तूर
कन्फेक्शनरी सुरू झाली.
धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.
६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.
विशेष माहितीसाठी लिहा.
पोस्टः—कृष्णा—कित्तूर
जिल्हा:—बेळगांव.
विंचूरकर ॲण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

## रेल्वे बजेटाबद्दल कांहीं विचार


( भा. म. का. )

चालू वर्षाच्या रेल्वेच्या अंदाजपत्रकावरून पुढील गोष्टी दिसून येतात. तिकिटांचे दर नुकतेच वाढविले गेल्यामुळें पुढील वर्षाची परिस्थिति समाधानकारक दिसते. परंतु विधायक कार्यक्रमाच्या दृष्टीनें फारशी प्रगति नाहीं असें म्हणावें लागतें. उदाहरणार्थ, कांचपाराऐवजीं असनसोल येथें इंजिनांचा कारखाना बांधण्याचें ठरविण्यांत आलें आहे. परंतु इंजिनांच्या प्रत्यक्ष बांधकामाला आणखी कांहीं वर्षें लागणार. गेल्या वर्षी सुमारें पंधराशें मैल लांबीच्या रेल रस्त्याचें विद्युत्करण करण्याचें ठरविलें होतें, परंतु या बाबतींत किती प्रगति झाली याची कांहींच कल्पना नाहीं स्वातंत्र्य, फाळणी नंतरची परिस्थिति, अन्नविषयक परिस्थिति इ. गोष्टींचा रेल्वेच्या कारभारावर परिणाम झालेला दिसतो. रेल्वे व्यतिरिक्त इतर कामगारांच्या संपांचाहि अप्रत्यक्ष परिणाम रेल्वेला सोसावा लागला असावा; कारण आवश्यक मालाचा पुरवठा व्यवस्थितपणें होऊं शकला नाहीं. पुढील वर्षी रेल्वेच्या कारभाराची कार्यक्षमता येथें उल्लेखिलेल्या कांहीं गोष्टींवर अवलंबून राहील असें संभवनीय दिसतें (१) कोळशाच्या उपयोगांत शक्य तितकी काटकसर, (२) रेल्वेचे डबे अगदीं अल्प वेळांत रिकामे केले जाणें व त्यांचा मालवहातुकीसाठीं त्वरेनें उपयोग करणें, (३) रेल्वेच्या कामगारांची कार्यतत्परता वाढविणें, (४) रेल्वेच्या डब्यांचा देशांतील कारखान्यांतून जास्त प्रमाणांत पुरवठा, (५) देशी रेल्वे इंजिनें तयार करण्याच्या कामांत दिरंगाई न होणें व त्याचबरोबर सध्यां परदेशांतून मागविण्यांत आलेलीं इंजिनें योग्य वेळीं हातीं येणें, (६) देशांत संपूर्ण अंतर्गत शांतता नांदून उतारू व माल यांच्या वाहतुकींत वाढ होऊन रेल्वेचें उत्पन्न वाढणें. रेल्वे कारभाराची कार्यक्षमता वाढविण्याचा आणखी एक मुख्य मार्ग म्हणजे खर्चांत शक्य ती उत्पादन–संवर्धक काटकसर. याचा येथें अर्थ पगार कमी करणें असा नव्हे, तर पगार वाढवूनहि प्रत्येक उत्पादक घटकाकडून जास्तींत जास्त उत्पन्न मिळवण्याची शक्यता. अमेरिका, इंग्लंड इ. देशांत रेल्वेच्या कारभारांत उत्पादन– संवर्धक काटकसर साधली आहे असें म्हणतात. त्या तऱ्हेची दृष्टि हिंदी रेल्वेच्या कारभारांत दिसून आली पाहिजे. रेल्वेच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनें रेल्वे रिझर्व्ह फंडाची रक्कम वाढविणें फार आवश्यक आहे. हिंदच्या रेल्वेची मालमत्ता सुमारें ६७८ कोटी किंमतीची आहे. परंतु १ एप्रिल १९४८ रोजीं रेल्वे रिझर्व्ह फंड फक्त रु. ३ कोटी ८० लक्ष किंमतीचा आहे. रेल्वेच्या कारभाराचा व्याप लक्षांत घेतां रिझर्व्ह फंडाची रक्कम अगदींच अल्प दिसते. ही रक्कम वाढविण्याचा प्रयत्न होणें इष्ट आहे. सध्यांचा काळ अद्याप एकंदर तेजीचा आहे. तूर्त कांहीं वर्षें वाढतें उत्पन्न व वाढता खर्च अशी परिस्थिति दिसून येईल. परंतु ही परिस्थिति कायम टिकणारी नव्हे. पुढें मागें कांहीं वर्षांनीं मंदी निर्माण झाली कीं तिची झळ प्रथम रेल्वेला सहन करावी लागेल. कारण, त्या काळांत खर्च कमी करणें जवळ जवळ अशक्य किंवा फार कठीण तरी होईल व उत्पन्न मात्र त्या मानानें कदाचित् घटेल. तेव्हां भावी काळांतील ह्या संभाव्य अडचणीला रेल्वे खात्यानें तोंड दिलें पाहिजे. सारांश, आजची परिस्थिति समाधानकारक आहे, तरी भावी काळासाठीं रेल्वे खात्यानें दूरवर विचार करून आर्थिक स्थिति कार्यक्षम व बळकट करण्याचा प्रयत्न करावा.




'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## दंग्याचा सक्तीचा विमा

म. गांधींच्या दुःखद वधानंतर महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं झालेल्या दंगलींत कांहीं कोट रुपयांचें नुकसान झालें. सक्तीच्या युद्धविम्याच्या योजनेमधून हिंदुस्थान सरकारकडे कित्येक कोट रुपये जमले. त्यांतील कांहीं रक्कम तसा प्रयत्न झाल्यास सरकार या नुकसानी-बाबत मदत म्हणून खर्च करूं शकेल. आजच्या राजकीय क्रांति-कालांत दंग्याचा विमा सक्तीनें उतरविण्याची योजना हातीं घ्यावी अशी सूचना मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. शं. वा. किर्लोस्कर तसेंच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. डी. आर. नाईक यांनीं हिंदुस्थान सरकारला केली आहे.

---

**स्वस्तिक रबर प्रॉडक्टस्** लि. पुणें २, या कारखान्यांतील सर्व मंडळींनीं तसेंच मॅनेजिंग एजन्ट्सूनीं आपलें दोन दिवसांचें उत्पन्न सुमारें एक हजार रुपये महात्मा गांधींच्या स्मारक निधीस देण्याचें ठरविलें आहे. सुप्रसिद्ध "देवल" भांड्यांना ( ६३१।१३, सदाशिव, पुणें २ ) ग्वाल्हेरच्या प्रदर्शनांत ब्राँझ मेडल व सर्टिफिकेट मिळालें आहे. सिंगापूरला भरलेल्या प्रदर्शनांत हिंदुस्थान सरकारतर्फें जो निवडक हिंदी माल पाठविण्यांत आला त्यांत "देवल" भांड्यांचा समावेश करण्यांत आला असून मिलन व पॅरिस येथें होणाऱ्या प्रदर्शनांतही 'देवल' भांडीं सरकारतर्फें पाठविलीं जाणार आहेत. महाराष्ट्राचे 'कांच महर्षि' श्री. रा. दा. चांदोरकर यांची अ. भा. सेरॅमिक सोसायटीचे चालू वर्षाकरता अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. **मागोरा केमिकल** कं. लि. पुणें २ यांनीं अमरावती व नागपूर येथें नुकतेच डेपो उघडले आहेत; ह्यामुळें हल्लींपेक्षा त्या बाजूस मालाचा प्रसार जास्त होणार आहे. **सुप्रीम म्युच्युअल विमा कंपनीनें** (पुणें २) मद्रास प्रांतांत नवीन प्रचार केन्द्र उघडलें असून मद्रास येथील सुप्रसिद्ध विमा व्यवसायी श्री. एस्. जोसेफ यांस मद्रास प्रांतांतील चीफ एजन्सी दिली आहे. **बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट** लि. (पुणें) यांचा साखरेचा कारखाना मध्यंतरीचे दंगलींनंतर पूर्ववत् चालू आहे. कारखान्याचे चालकांनीं कामगारांची सभा घेऊन महात्मा गांधींचे स्मृतीस श्रद्धांजलि अर्पण केली. माळीनगर येथील **सासवड माळी शुगर फॅक्टरीचे** कामगारांचे वतीनें करण्यांत आलेली पगारवाढीची मागणी मान्य झाली असून डायरेक्टरांनीं ही वाढ चालू महिन्यापासून करण्याचें ठरविलें आहे. सोलापुरांत जुन्या गिरणीच्यामागें **श्री सोलापूर इंजिनिअरिंग वर्क्स** लि. या कारखान्याचें नुकतेंच उद्घाटन झालें. गेल्या जानेवारींत, 'निव्वळ हातसूत हातमागावरील खादी विकणाऱ्या **खादी मंदिराच्या** (बुधवार, पुणें २) चालकांना मुंबई सरकारतर्फें त्यांचे पाटीवरील 'खादी' हा शब्द काढण्याबद्दल समज दिली होती. तशीच समज मुंबई येथील कांहीं खादीचे व्यापाऱ्यांना मिळाली. या प्रकरणीं सरकारी हुकुमाविरुद्ध मुंबई येथील 'खादी स्टोअर्स' च्या चालकांनीं मुंबई हायकोर्टांत तक्रार गुदरली; तेव्हां सरकारनें सदर दुकानावरील आपला हुकूम मागें घेतला. त्यामुळें आतां 'खादी' हा शब्द काढून टाकण्याचा प्रश्न उरत नाहीं. **मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या** कार्यकारिणीनें, पॅरॅमॉउन्ट पब्लिसिटी सिंडिकेट लि. नें चालू केलेली औद्योगिक वृत्तवितरणाची योजना स्तुत्य असून त्याबाबत सर्वत्रांनीं सहकार्य करावें असें मत प्रकट केलें आहे.

( पॅरॅमाउंट प. सिं. लि. मार्फत )

## निर्यात करण्यास अमेरिकेजवळ भांडवल नाहीं !

अमेरिकेजवळ परदेशांतून गुंतविण्यासाठीं भांडवल आहे कीं नाहीं ह्यासंबंधीं हवाना येथील व्यापारी परिषदेंत चर्चा झाली. कांहीं परदेशी प्रतिनिधींची अशी कल्पना झाली कीं अमेरिकेजवळ इतकें भांडवल आहे कीं त्याचें काय करावें हेंच अमेरिकन सरकारला कळत नाहीं. पण, अमेरिकन सरकारच्या मतें तशी परिस्थिति नाहीं. खुद्द अमेरिकेंत ४० महापद्म डॉलर्स खाजगी भांडवलाची मागणी आहे. परंतु प्रत्यक्ष पुरवठा २७ महापद्म डॉलर्सपेक्षा अधिक होऊं शकणार नाहीं. नवीन उद्योगधंदे उभारण्यासाठीं आणि रेल्वेज बांधण्यासाठीं इतक्या भांडवलाची तेथें गरज आहे, कीं अमेरिकन भांडवलाला बाहेरची बाजारपेठ अत्यावश्यक आहे असें मुळींच नाहीं. हवाना येथील परिषदेंत अमेरिकन प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष, मि. क्लेअर विल्कॉक्स, ह्यांनीं हा मुद्दा स्पष्ट केला. खाजगी भांडवलाला परदेशांत गुंतविण्याची सक्ती अमेरिकन सरकारनें केलेली नाहीं. खाजगी भांडवलाची निर्यात ही पूर्णपणें ऐच्छिक बाब असून, ज्या ठिकाणीं फायदा व शाश्वति हीं दोन्हीं जास्त असतील तेथेंच खाजगी भांडवल गुंतविलें जाईल. परकीय भांडवलाला बंदी करण्याचें स्वातंत्र्य कोणत्याही देशाला अर्थातच आहे. कोणत्याही अमेरिकन भांडवलदाराला त्याचा पैसा जेथें नको असेल तेथें गुंतविण्याची इच्छा नाहीं. परंतु, एकदा भांडवल गुंतविण्याची परवानगी दिल्यावर त्याला योग्य वागणूक मिळाली पाहिजे; अशा रीतीनें परकीय भांडवलाला संधी देण्यांत आली तरच बऱ्याच देशांतील औद्योगीकरण झपाट्यानें होईल असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

---

**पौंडाची किंमत कमी होणार नाहीं**—ब्रिटिश परराष्ट्र खात्यातर्फें ब्रिटिश पौंडाच्या किंमतीबद्दल एक पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें असून अमेरिकेंत ह्या पत्रकाला बरीच प्रसिद्धि देण्यांत येत आहे. पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, ब्रिटनची निर्यात वाढल्या-शिवाय निर्यातीचें उत्पन्न वाढणार नाहीं. ब्रिटनची आयात कमी करतां येणें शक्य नसल्यामुळें आयातीची किंमत मात्र वाढेल. अशा परिस्थितींत, पौंडाची किंमत कमी केल्यानें ब्रिटनची परिस्थिति अधिकच बिकट होऊन डॉलर्सचा तुटवडा अधिकच तीव्र होईल. पुढेंमागें ब्रिटिश मालाच्या निर्यातीच्या किंमतीला स्पर्धा जाणवूं लागली तर मात्र हुंडणावळीच्या दरांत बदल होण्याचा संभव आहे.

**चीनच्या चलनाचा तोल सुटला**—अमेरिकेच्या एका डॉलरसाठी चीनमध्यें चलनाच्या काळ्या बाजारांत २,२५,००० चिनी डॉलर्स द्यावे लागत आहेत. काळ्या बाजारांत १ औंस सोन्याला १ कोटी, ५० लाख चिनी डॉलर्स द्यावे लागत आहेत. खुल्या बाजारांत अमेरिकेच्या ६७ डॉलरला १ औंस सोनें मिळतें. कांहीं दिवसापूर्वी हा भाव ७२ डॉलर्स होता.







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
स. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.